REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २७ एप्रिल, १९३८ अंक १७



चिक्कार गर्दीचा
चौफेर चर्चेचा
चढत्या कीर्तिचा
४था आठवडा
शनिवार ता. २३ एप्रिलपासून सुरू

"कान्होपात्रा"नें सर्व वर्गांच्या प्रेक्षकांचीं
मनें आकर्षून घेतलीं !
गोड भजनांत भाविक दंग झाले !
नटवर्य लोंढे यांचीं गाणीं गुणगुणत
रसिकवर्य गुंग झाले !
'कान्होपात्रा कीर्तन-सप्ताह'
पुण्यनगरींतील प्रमुख मंदिरांत लौकरच
सुरू होणार !

(वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि०च्या खास व्यवस्थेखालील)
रे-मार्केट जवळ पुणें) मिनर्व्हा (फो. नं. ३५८

शालिनी सिनेटोनचा मराठी बोलपट
कान्होपात्रा
दिग्दर्शक:—भाल. जी. पेंढारकर
भूमिका:—लीला, लोंढे, दिनकर
ढेरे (कामण्णा), चिंतामणराव कोल्हट-
कर, दानवे, शांताबाई, इन्दुबाला.

दररोज दोन खेळ:—६॥ व १० वा.
शनि. व रवि. जादा खेळ दु. ३॥ वा.

## विविध माहिती

### हरिद्वार येथील कुंभ मेळा—पोस्टास वाढतें काम

हरिद्वार येथील कुंभ मेळ्याचे वेळीं मोठी यात्रा जमते,त्यामुळें इतर खात्यांप्रमाणें पोस्टाचेंहि काम वाढतें. रोज सुमारें २५हजार पत्रें वाटावीं लागतात, ५०० तारा येतात व १,००० तारा बाहेरगांवीं जातात.

### ग्रेट ब्रिटनमधील दुकानें

प्रत्येक ४० ते ४५ नागरिकांमागिक एक दुकान,असें ग्रेट ब्रिटनमध्यें दुकानांचें प्रमाण पडतें.

### मोटार बसेसमध्ये पोस्टाच्या पेट्या

मुंबई शहरांतील कांहीं 'बेस्ट' बसेसना २० एप्रिल पासून पोस्टाच्या पेट्या लावण्यांत आल्या असून त्यांतील पत्रें रोज एकदां काढून घेण्यांत येतात. बसेसमधील उतारू ह्या सोईचा किती फायदा घेतात, ह्याचा सहा महिने अनुभव घेऊन पेट्यांची संख्या वाढविण्यांत येईल.

### गोल्ड कोस्टमधील चालीरीती

आफ्रिका खंडाच्या वायव्य सरहद्दीवरील गोल्ड कोस्ट ह्या ब्रिटिश वसाहतीमध्यें साक्षर पोलिस व निरक्षर पोलिस ह्यांस वेगवेगळ्या रंगांचे गणवेष देण्यांत येतात. आठवड्यांतील विशिष्ट दिवशीं जन्मलेल्या प्रत्येक मुलाचें व मुलीचें ठराविक तेंच नांव ठेवण्यांत येतें.

### लंडन येथील इस्पितळांचा खर्च

लंडन शहरांतील १४५ इस्पितळें चालविण्यास दररोज सुमारें १५ लक्ष रुपये खर्च येतो, त्यापैकीं ६½ लक्ष रुपये मदतीच्या रूपानें जमविण्यांत येतात.

### धूम्रपान व चढाईचें धोरण

हुकूमशहा हिटलर व मुसोलिनी हे दोघेहि धूम्रपान करीत नाहींत. नेपोलियनाहि धूम्रपान करीत नसे. ह्या उलट, अमेरिका, फ्रान्स, ग्रेटब्रिटन ह्या लोकसत्तेखालील देशांचे अध्यक्ष व मुख्य प्रधान ह्यांस धूम्रपान अत्यंत प्रिय आहे. धूम्रपानाचा व शांतता अगर युद्ध ह्यांचा कांहीं संबंध आहे काय ? हिटलर व मुसोलिनी ह्यांची गट्टी जमली आहे.

### मध्यवर्ती असेंब्लीच्या बैठकी व प्रेक्षकांची संख्या

मध्यवर्ती असेंब्लीच्या नुकत्याच संपलेल्या अधिवेशनांत तिच्या एकूण ४५ बैठकी झाल्या,त्यापैकीं ८ बैठकी बिनसरकारी ठराव व बिलें ह्यांसाठीं राखलेल्या होत्या. एकूण ८,७११ प्रेक्षकांनीं असेंब्लीच्या कामाचें अवलोकन केलें. ११ एप्रिल रोजीं सर्वांत ज्यास्त म्हणजे ४४२ प्रेक्षक हजर होते. प्रेक्षकांच्या हजेरीची रोजची सरासरी १९४ भरली.

### त्रावणकोर संस्थानाच्या कर्जरोख्यांचा दर्जा

हिंदुस्थान सरकारनें त्रावणकोर संस्थानाच्या कर्जरोख्यांस स्वतःच्या कर्जरोख्यांचा दर्जा दिला आहे. त्रावणकोर संस्थानानें मागें ५० लक्ष रुपयांचें कर्ज उभारलें त्यावेळीं मागणीच्या आठपट रकम जमली.

### अमेरिकेंत सर्वच कांहीं प्रचंड

अमेरिकेंतील जनरल मोटर्स कॉर्पोरेशन कंपनीच्या अध्यक्षास सालिना १४½ लक्ष रुपये मिळतात. त्याच्या सहायकांचा वार्षिक पगार प्रत्येकी १० लाखांचे आसपास आहे. प्रचंड व्यवहार करणाऱ्या मोठ्या कारखान्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या पगाराचें इतकें मोठें मान अमेरिकेबाहेर आढळणार नाहीं.

### ब्रिटन व रशिया ह्यांचेमधील व्यापार

१९३७ सालीं रशियानें ग्रेटब्रिटनकडून १० कोटि रुपये किंमतीचा माल घेतला व ३० कोटि रुपये किंमतीचा माल ग्रेट ब्रिटनकडे निर्गत केला. जर्मनी, अमेरिका व फ्रान्स ह्या तिन्ही देशांची मिळून रशियन मालाची खरेदी ब्रिटनच्या खरेदी इतकी झाली नाहीं.

### म्हैसूरांतील कॉफीची लागवड

हिंदुस्थानांतील कॉफीच्या एकूण उत्पादनापैकीं शेकडा ४७ इतकें उत्पादन म्हैसूर संस्थानांत होतें. कॉफीखालील एकूण क्षेत्रापैकीं शेकडा ५५ इतकें क्षेत्र म्हसूरचे हद्दींत आहे. १९३५-३६ सालीं १ लक्ष, ३ हजार एकरांत कॉफी लाविली होती.

### रत्नागिरीच्या आंब्यास मुंबई बाजारांत चांगला भाव नाहीं

रत्नागिरीहून हापूस व पायरी आंबे मुंबई बाजारांत येऊं लागले आहेत, परंतु अद्याप मागणी पुरेशी नसल्यामुळें बाजारभाव मंदीचा आहे. रोज सुमारें २०० पेट्या (१ पेटी=६ ते ७ डझन आंबे ) मुंबईस येतात.

### ट्रेझरी बिलांची विक्री

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ३ महिने मुदतीचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द.शे. १ रु. ८ आ. ७ पै पडला. मध्यप्रांत सरकारासाठीं ९ महिने व ३ महिने मुदतीचीं अनुक्रमें २५ लक्ष व १५ लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ९ आ. ४ पै व १ रु. १२ आ. पडला.

### युद्धोपयोगी विमानांची खरेदी

ग्रेट ब्रिटनकरितां युद्धोपयोगी विमानें खरेदी करण्यासाठीं ब्रिटिश वैमानिक खात्यांतील तज्ञ गेल्या आठवड्यांत अमेरिकेकडे रवाना झाले. ब्रिटिश उत्पादनाची गतिहि वाढविण्यांत यावयाची आहे.

### बायबलमधील शब्दांची संख्या

बायबल ह्या खिस्ती-धर्मग्रंथांत १,१८९ प्रकरणें ८,१०,६९७ शब्द व ३५,६६,४८० अक्षरें आहेत. "आणि" हा शब्द ४६,६२७ वेळां आढळतो.

### गुलामगिरी अद्याप चालू आहे

१९२६ सालीं राष्ट्रसंघानें जगांतील सर्व गुलामांचें दास्यत्व नष्ट करण्याचें ठरविलें. तरी अद्याप ५० लक्ष लोक गुलामगिरींत आहेत. गुलामांच्या उघड व्यापारास आतां आळा बसला आहे; तथापि इतर अनेक मार्गांनीं गुलामगिरी चालू असल्याचें आढळतें.

### हरविलेल्या राज्यारोहण पदकांचे ऐवजी नवीं पदकें

राज्यारोहणाचीं ज्यांचीं पदकें हरविलीं असतील, त्यांनीं १०½ शिलिंगाच्या किंमती इतकें रुपये सरकारकडे भरल्यास नवीन पदकें देण्याची व्यवस्था करण्यांत येईल. ह्या बाबतची तपशीलवार योजना सरकारनें जाहीर केली आहे.

### अमेरिकन, ब्रिटिश व जर्मन कामगारांची प्राप्ती

अमेरिकन कामगाराची वार्षिक मिळकत सुमारें ३,३०० रुपये आहे. ब्रिटिश व जर्मन कामगारास अनुक्रमें २,००० रुपये व १,९०० रुपये मिळतात.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| १७-४-३८ ते २३-४-३८ | ९,८२,६१७ |
| २१-९-३१ ते २३-४-३८ | ३,१३,४०,२९,८३० |

## अनुक्रमणिका

पृष्ठ

१ विविध माहिती ... १९४
२ जुगार ... ... १९५
३ वेस्टर्न इंडिया विमा कंपनी—प्रगतीचे बोलके आकडे—मूल्यमापनें काय दर्शवितात ! ... ... १९६
४ स्फुट विचार ... १९७
हिंदुस्थानची परराष्ट्रीय हुंडणावळ—हुंड्यांचा अपुरा पुरवठा—हुंडणावळीचें पुढें काय होणार !—श्रीगजानन मिल्सचा रौप्य महोत्सव—बँबे को. कार्टेली
५ संयुक्त मांडवलाच्या हिंदी मंडळ्या ... ... १९९
६ विजयानगरम् येथें सहकारी प्रश्नांची चर्चा २०२
७ निवडक बाजारभाव २०२
८ हिंदी बंदरांतून चालणारा व्यापार ... ... २०३
९ हिंदी कोळशाच्या खाणी २०३
१० नवीन विक्रीस निघालेले भाग. २०५
११ कोलार येथील कोळशाच्या खाणी ... ... ... २०५

# अर्थ

बुधवार, ता. २७ एप्रिल, १९३८

## जुगार

गंमत म्हणून, नशीबाची परीक्षा म्हणून आणि विशेषतः श्रमावांचून संपत्तीचा लाभ व्हावा म्हणून जुगार खेळण्याचा नाद माणसांमध्यें अनादि काळापासून दिसून येत आहे. माणसांची बुद्धी, ऐपत आणि संधी ह्यांच्या मानानें जुगारीचे प्रकार व परिमाण हीं निरनिराळीं असलीं तरी त्यांच्या मुळांतली प्रवृत्ति एकच असते. एखादी गोष्ट घडून येण्याची शक्यता, मानवी बुद्धि व कर्तृत्व ह्यांच्या आटोक्याच्या बाहेर असतांना तिच्या-संबंधानें निश्चित मत अगाऊ व्यक्त करून पैज लावणें ही जुगार होय. कार्यकारण संबंध जेथें स्पष्ट नसतो किंवा स्पष्ट असूं शकत नाहीं तेथें त्याचा कयास बांधण्यांत काळ, शक्ति व पैसा खर्चणें हा मानवी आयुष्याचा दुरुपयोग आहे. गेला तर एक रुपयाच जाईल पण आले तर पांचशे रुपये मिळतील ह्या कल्पनेनें पैज मारून स्वतःची संपत्ति पणाला लावणें ह्या जुगारीचे अलीकडे तर नानाविध प्रकार झाले असल्यानें तिच्या जाळ्यांत सांपडून स्वतःचा नाश करून घेणारांची संख्या सारखी वाढत आहे. मानवी जुगारी स्वभावाचा फायदा स्वतःस करून घेण्याची वैयक्तिक प्रवृत्तीहि साहजिकच आहे. ह्या कारणानें जुगारीच्या अनेक योजना अमलांत येऊन सामान्य जनतेच्या खिशास चाट लावीत आहेत. जुगारीचे कांहीं ठळक प्रकार कायद्यानें निषिद्ध मानले असून तिच्या संबंधानें होणारे खटले व शिक्षा यांचीं वर्णनें वृत्तपत्रांत प्रत्यहीं प्रसिद्ध होत आहेत, ह्यावरून ह्या व्यसनाचीं मुळें किती खोल गेलेलीं व विस्तृत आहेत, याची कल्पना येण्यासारखी आहे. घोड्यांच्या शर्यती, कपाशीचे बाजारभाव, अनेक प्रकारचीं कोडीं व चढा-ओढी ह्यांचे बाबत मोठ्या प्रमाणावर जुगार चालते आणि तिला आळा घालण्याचे प्रयत्न कसून झाले पाहिजेत अशी विचारी लोकांची मागणी आहे. कांहीं प्रकारांच्या अंदाजावर आधारलेले देण्याघेण्याचे करार कायदेशीर समजले जातात आणि त्यांपैकीं कित्येक तर प्रतिष्ठित मानण्यांत येतात. ह्या कारणानें निवळ नशीबाचा खेळ कोणता आणि बुद्धी व ज्ञान ह्यांवर आधारलेला निर्णय कोणता हें ठरवणें प्रत्येक बाबतींत सुलभ नसल्यानें सर्वच अंदाजांस व चढाओढींस जुगारीच्या सदरांत ढकलणें अयोग्य आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. तसेंच, अनेक तऱ्हांच्या कूट प्रश्नांचीं उत्तरें ज्ञान व बौद्धिक श्रम ह्यांचेवांचून देतां येत नसल्यानें आणि ते घटकाभर मौज म्हणून सोडवले जात असल्यानें त्यांचे विरुद्ध तक्रार करणें हा फाजिल नैतिक सोवळे-पणा आहे असेंहि म्हणणारे कांहीं लोक आढळतील. तथापि, निवळ नशीबाचा खेळ कोठें आहे आणि तो कसा खेळला जातो ह्याची चौकशी केली असतां अंदाजाचे त्याज्य प्रकार कोणते व कां हें समजणें अवघड नाहीं.

एकाच प्रश्नास अनेक उत्तरें शक्य असलीं आणि त्यांपैकीं अगाऊ पण गुप्तपणानें निश्चित केलेल्या विशिष्ट उत्तरासच बक्षिस मिळावयाचें असलें म्हणजे ह्या नशीबाच्या खेळांत हजारो लोकांनीं घातलेल्या पैशांतून थोड्या जणांसच लाभ होणार हें उघड आहे. पैसे गमावणारे लोक आपल्या नशीबाची परीक्षा पुन्हां, पुन्हां पाहण्यास प्रवृत्त होणार आणि बुडत्याचा पाय खोलांत ह्या न्यायानें अधिकाधिक नुकसानींत येणार. सामाजिक व वैयक्तिक दृष्टीनें पाहतां असल्या बक्षिसांच्या चढाओढींत आर्थिक लाभ कांहींच नाहीं. अनेकांच्या खिशांतले पैसे एका ठिकाणीं जमा होऊन त्यांची वांटणी कांहीं थोड्या जणां-मध्यें होते; ह्यांत धंदा नाहीं, व्यापार नाहीं व संपत्तीचें उत्पादन, नाहीं. चढाओढी लावणारांस प्राप्ती होते, तीहि उत्पादक श्रमाचें फळ आहे असें म्हणतां येत नाहीं. ह्यासाठीं गोरगरीब व मध्यम स्थितींतली जनता ह्यांच्या सांपत्तिक व कौटुंबिक हिताच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाचा विचार होणें अगत्याचें आहे. पाश्चात्य देशांत कोडीं व विविध तऱ्हांच्या चढाओढी ह्यांचें खूळ मनस्वी माजलें आहे, त्याची लाट ह्या देशांत पसरूं देणें हानिकारक आहे कीं नाहीं आणि त्याच्या विरुद्ध इलाज करणें इष्ट व शक्य आहे किंवा नाहीं ह्याची शहानिशा सरकारनें व जनतेच्या पुढाऱ्यांनीं करणें आवश्यक आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें जुगारीची संवय कोणत्या थरास गेली आहे, ह्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे तीवरून पुष्कळ बोध घेतां येईल.

भिन्नभिन्न प्रकारांच्या जुगारींत ग्रेट ब्रिटनमध्यें दरवर्षी सुमारें ४७० कोटि रुपयांची उलाढाल होते, असा अंदाज आहे. घोड्यांच्या शर्यतींत ३२५ कोटि, कुत्र्यांच्या शर्यतींत ५२ कोटि, फुटबॉलच्या सामन्यांच्या अंदाजांत ६६ कोटि आणि इतर चढा-ओढींत १२ कोटि असा ह्यांतला तपशील आहे. ह्या रकमांत चढाओढींच्या व्यवस्थेचा व जाहिरातींचा खर्च व नफा ह्यांचा समावेश आहे. त्यांतून शिल्लक उरणाऱ्या रकमा लक्षावधि लोकां-कडून जमा केलेल्या असतात आणि थोड्या जणांत वांटल्या जातात. फुटबॉलच्या सामन्यांच्या निकालांच्या अंदाजांत ९० लक्ष लोक भाग घेतात आणि त्यांपैकीं थोड्या जणांचे हातीं बक्षिसें येतात. पैसे गमावणारे बहुसंख्य लोक कर्जबाजारी बनून कित्येक गुन्ह्यांस प्रवृत्त होतात. शर्यती आणि चढाओढी ह्यांवर ग्रेट ब्रिटनमध्यें हजारो लोक धंदेवाइक व नोकर ह्या नात्यांनीं खोऱ्यानें पैसा ओढीत आहेत. ह्या जुगारीस पूर्ण बंदी करतां आली नाहीं तरी त्या व्यवसायाच्या नफेबाजीस व जाहिरातीस मर्यादा घालण्यांत यावी म्हणजे तिला कांहीं आळा बसेल अशी सूचना करण्यांत आली आहे ती विचार करण्यासारखी आहे. अल्प प्रमाणांत मादक पदार्थांचें सेवन करण्यास काय हरकत आहे असा युक्ति-वाद दारुबंदीचे विरुद्ध पुढें मांडणारे लोक आहेत. त्याप्रमाणेंच, शर्यती, कोडीं, सोडती, किंमतींचे अंदाज, चढाओढी ह्यांचेंहि समर्थन करणारे भेटतील. परंतु हा आर्थिक व सामाजिक सुस्थितीचा प्रश्न असल्यानें जुगार रूढ आहे, दृढमूल आहे, दुर्निवारणीय आहे, असें म्हणून तिच्या बाबतींत स्वस्थ बसणें केव्हांहि समर्थनीय होणार नाहीं.

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

### अभिमानास्पद प्रगति

सातारा येथील वेस्टर्न इंडिया कंपनी ही महाराष्ट्रांतली प्रथितयश आणि अत्यंत नाणावलेली अशी मंडळी आहे. तिच्या मुंबई येथील "वेस्टर्न इंडिया हाउस" ह्या स्वतःच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ रविवार, ता. १० एप्रिल, १९३८ रोजीं शेठ घनःशामदास बिर्ला ह्यांचे हस्तें मोठ्या थाटानें झाला. कंपनीच्या जिंदगीचा कांहीं भाग आपल्या मालकीच्या स्थावर मिळकतींमध्यें गुंतविण्याची आतां वेळ आली आहे, हें पाहून कंपनीनें ही टोलेजंग इमारत उभारली आहे. इमारतीची जागा फोर्टमध्यें सर फेरोजशहा मेथा रोड ह्या नवीन रस्त्यावर प्रमुख जागीं आहे. सदरहु इमारतीमध्यें कंपनीनें ५½ लक्ष रुपये गुंतविले आहेत.

वेस्टर्न इंडियाचें काटकसरीचें धोरण, तिची किफायतशीरपणें रकमा गुंतविण्याची हातोटी, भरपूर लाइफ फंडाची व राखीव निधींची तरतूद, तात्कालिक मजबुती आणणारीं वैशिष्ट्यें, इत्यादींसंबंधीं "अर्था" मध्यें अनेकवार अभिनंदन करण्यांत आलेलें आहे आणि कंपनीच्या प्रस्तुतच्या नवीन उपक्रमाच्या निमित्तानें तिच्या वैशिष्ट्यांचा पुनरुच्चार करणें उचित आहे. हिंदी विमा कंपन्यांत वेस्टर्न इंडियाचें स्थान अत्यंत उच्च आहे, ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे.

१९३७ अखेर कंपनीकडे ३ कोटि, ६५ लक्ष रुपयांचे विमे चालू असून विमा खातीं फंडामध्यें ८० लक्ष रुपये आहेत. हप्त्यांचें व व्याजाचें उत्पन्न २२–२३ लक्ष रुपये इतकें होतें. कंपनीनें आपला व्याप वाढविण्याचें प्रगतिपर धोरण स्वीकारून आतां आपल्या सुरक्षितपणाचा उत्कृष्ट उपयोग करण्याचें ठरविलें आहे, हें योग्यच आहे. कंपनीची परिस्थिति अत्यंत समाधानकारक व इतर विमा कंपन्यांस आदर्शवत् आहे, हें तिच्या व्यवहाराविषयींच्या खालीं दिलेल्या आकड्यांवरून स्पष्ट होईल.

### प्रगतीचे बोलके आकडे

| वर्ष | वय | वार्षिक हप्त्याचें उत्पन्न | नवीन काम | एकूण चालू काम | लाइफ व रिझर्व्ह फंड | बोनस | डिव्हिडंड % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९१७ | ४ | ४२४५९ | ३००४५० | ८५१६०९ | ४०१०९ | — | ५ |
| १९२० | ७ | १०५४५५ | ६९६५०० | २२११७५० | १३२८०२ | ७॥ | ५ |
| १९२३ | १० | २२९५८७ | १११४७५० | ४४८७७०३ | ५०१८५९ | १० | ७ |
| १९२६ | १३ | ३७६४५७ | १४७६२६० | ७४५६८९१ | १२९४८७५ | १८ व २२॥ | १० |
| १९२९ | १६ | ६३७६७० | २८३८००० | १२२७३१५२ | २५५३९७९ | | १५ |
| १९३२ | १९ | ९५६९७८ | ३७१२५५२ | १९२४२०८० | ४१५३२८१ | २० | २० |
| १९३५ | २२ | ३८२४९८ | ५१३००४२ | २७६०१५२९ | ६६८४२९८ | व | २० |
| १९३६ | २३ | १६३०८१० | ६६४९८३९ | ३२१०७१२२ | ७७०५३७९ | २५ | २० |
| १९३७ आकडे अंदाजी | २४ | १८ लक्ष | ६७·४१ लक्ष | ३६५ लक्ष | ८० लक्षांहून अधिक | | २० |

### मूल्यमापनें काय दर्शवितात ?

| मूल्यमापन वर्ष | नफ्याची रक्कम | हयातीनंतर | हयातींतील | राखीव निधि | खर्चाचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १९१७ | ११५२३ | × | × | × | ३९·९१ |
| १९२० | २७७३८ | ७½ | ७½ | ३६५९८ | ३४·३४ |
| १९२३ | ११६५४४ | १० | १० | ८३४४६ | २४·८० |
| १९२६ | ३२५६२९ | २२½ | २० | ३४२१७१ | २५·३१ |
| १९२९ | ५२७८३२ | २५ | २० | | २५·३२ |
| १९३२ | ४९३८१९ | २५ | २० | ६३४०३७ | २५·१६ |
| १९३५ | ९२०५९३ | २५ | २० | ६४०५०६ | २४·१८ |

अप-टु-डेट शिलाई करतां
महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणे] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

# स्फुट सूचना

### हिंदुस्थानची परराष्ट्रीय हुंडणावळ

ह्या देशांतील सरकारच्या वतीनें त्याच्या उत्पन्नामधून सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियास लंडनमध्यें ज्या रकमा प्रतिवर्षी खर्चाव्या लागतात त्या वेळचे वेळीं इकडून विलायतेस पाठविल्या जाण्याची समाधानकारक व्यवस्था असणें आवश्यक आहे हें उघड आहे. बरींच वर्षे चालत आलेली ह्या संबंधांतली पद्धति अशी होती कीं सेक्रेटरी ऑफ स्टेट दर आठवड्यास हिंदुस्थान सरकारावर हुंड्या काढून त्या लंडनमध्यें टेंडर्स मागवून विकीत असे. ज्या व्यापाऱ्यांस व बँकांस आपल्या व्यवहारांसाठी लंडनहून इकडे पैसे पाठवावयाचे असत ते त्या हुंड्या खरेदी करीत आणि त्या हिंदुस्थान सरकारावर पटवल्या जाऊन त्यांच्या रकमा वसूल करीत. त्या योगानें सेक्रेटरी ऑफ स्टेटला हिंदुस्थान सरकाराकडून यावयाचे पैसे लंडनमध्यें मिळून तेथील व्यापारी व बँका ह्यांची तिकडून ह्या देशांत पैसे पाठवण्याची सोय होत असे. अलीकडे कित्येक वर्षे हीच पद्धति निराळ्या तऱ्हेनें, म्हणजे उलट दिशेनें, अवलंबण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकार स्वतःच टेंडर्स मागवून ह्या देशांत हुंड्या खरेदी करतें व त्या सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे पाठवितें आणि लंडनमध्यें तो त्यांचे पैसे वसूल करतो. वर वर्णिलेली बँकांची व व्यापाऱ्यांची सोय ह्या पद्धतीनेंहि होते आणि ती हिंदुस्थान सरकारास अधिक सोयीची वाटते. ज्यांस विलायतेहून इकडे पैसे पाठवावयाचे, त्यांनीं लंडनमध्यें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या हुंड्या विकत घेतल्या काय आणि ज्यांस तिकडून पैसे मिळावयाचे त्या येथील लोकांनीं हिंदुस्थान सरकारास आपल्या हुंड्या विकल्या काय, दोन्हीं पद्धतींचा परिणाम एकच. रिझर्व्ह बँक स्थापन झाल्यापासून हुंड्या खरेदी करून हिंदुस्थान सरकारचे पैसे सेक्रेटरी ऑफ स्टेटला पोचते करण्याचें काम त्या संस्थेकडे आलें आहे आणि दर आठवड्यास हुंड्यांच्या खरेदी विषयींचीं टेंडर्स तीच मागवते.

---

### हुंड्यांचा अपुरा पुरवठा आणि उतरलेला दर

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर हुंड्यांचा पुरवठा व त्यांस असलेली मागणी ह्यांच्या परस्पर-संबंधावर अवलंबून असतो. येथें एक रुपया दिला असतां लंडनमध्यें १८$\frac{१}{२}$ पेन्स मिळावे ह्या बेतानें तो दर आजवर बराच काळ टिकून राहिलेला आहे. हिंदी शेतीच्या मालाचे बाजारभाव उतरले आणि त्यास परदेशांत कमी मागणी येऊं लागल्यानें निर्गतींत घट झाली. तीवर आधारलेल्या हुंड्यांचा पुरवठाहि वास्तविकपणानें मर्यादित व्हावयाचा. तथापि, सोन्याची निर्गत सारखी चालू असल्यामुळें पुरेशा हुंड्या बाजारांत येत असत आणि त्यांचा दर स्थिर रहात असे. परंतु अलीकडे आयात व्यापाराची चलती असतां निर्गत व्यापार मंदावला आहे आणि ह्या कारणानें हुंड्या खरेदी करणारांच्या मागणीच्या मानानें हुंड्या विकणारांच्या पुरवठ्याचें परिमाण उतरलें आहे. लंडनला पाठवावयाच्या पैशापुरत्या हुंडया मिळण्याची रिझर्व्ह बँकेस अलीकडे अडचण पडून दर रुपयास $\frac{१}{३२}$ पेनी कमी स्वीकारणें तिला प्राप्त झालें आहे. १९३७-३८ सालांत सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे २$\frac{१}{२}$ कोटि पौंड पाठविण्याची रिझर्व्ह बँकेची योजना होती, पण हुंड्यांच्या तुटवड्यामुळें ती फक्त २ कोटि पौंडच पाठवूं शकली. बाकीच्या रकमेची भरती लंडनमधल्या शिलकेमधून रकमा काढून तिला करावी लागली आहे. येथील ट्रेझरी बिलांवर चढता व्याजाचा दर देऊन लंडनमधून इकडे पैसा आकर्षून घेण्याच्या तिच्या प्रयत्नास यश आलेलें नाहीं. तिकडचा पैसा हिंदुस्थानांत आला असता तर इकडून पाठवावयाच्या पैशाची त्यांतून वजावाट करतां येणें शक्य होतें. परंतु तसें न घडल्यानें आपल्या हुंडी-खरेदीचा दर रिझर्व्ह बँकेनें थोडासा कमी केला आहे. येथें एक रुपया देऊन त्याच्या मोबदला लंडनमध्यें कमी पेन्स घेण्यास ती तयार आहे. ह्याचाच अर्थ, विलायतची हुंडी येथें विकणारास पूर्वीच्या दराच्या मानानें दर ब्रिटिश पौंडाबद्दल थोडीशी अधिक किंमत मिळणार आहे. दर रुपयास १८$\frac{५}{३२}$ पेन्स हा हुंडणावळीचा दर दीर्घकाळ पर्यंत स्थिर राखतां आला ह्याविषयीं कौतुक करण्यांत येत होतें. आतां परिस्थितीपुढें इलाज नाहीं असें म्हणून रिझर्व्ह बँकेस दर रुपयामागें $\frac{१}{३२}$ पेनी कमी घेतल्यावांचून गत्यंतर राहिलेलें नाहीं.

---

### हुंडणावळीचें पुढें काय करणार ?

"हुंडणावळीचा दर आर्थिक परिस्थितीस अनुसरून ठरत असतो. तो निश्चित करण्याची जादू हिंदुस्थान सरकारास अवगत नाहीं" हा बोध लोकांनीं घ्यावा असें "फिनॅन्शल न्यूज" हें ब्रिटिश वृत्तपत्र सदरहु दर अलीकडे कमी करावा लागला आहे ह्या गोष्टीस अनुलक्षून म्हणतें. परंतु हिंदी लोकांस त्यांत कांहीं विशेष नवें आहे असें वाटण्याचें कारण नाहीं हें तें पत्र विसरलें आहे. मंदीच्या परिस्थितींत १८ पेन्सांचा दर हितावह आणि व्यवहार्य व टिकाऊ नाहीं आणि सोन्याच्या निर्गतीमुळेंच केवळ तो तग धरून राहिला आहे अशी टीका हिंदुस्थानांत वारंवार करण्यांत आली असतां तिकडे दुर्लक्ष केलें गेलें आहे आणि आतां हीच गोष्ट ब्रिटिश पत्रें उंटावरून आम्हांस शिकवीत आहेत! गेल्या मार्च महिन्यांत १९३७ च्या मार्चच्या मानानें निर्गत व्यापार पुष्कळच घटला आणि आयात व्यापार वाढला. ही वस्तुस्थिति हुंडणावळीचा दर खाली खेचण्यास कारणीभूत होणें स्वाभाविकच होतें. सोन्याची निर्गत हळुहळु सारखी कमी होत आली आहे आणि रिझर्व्ह बँकेनें खरेदी केलेल्या परराष्ट्रीय हुंड्यांच्या रकमाहि घटल्या आहेत. दर आठवड्यास विकत घ्यावयाच्या हुंड्यांची रकम २० लक्ष पौंड अशी जाहीर करण्यांत येत असे आणि त्या रकमेचीं टेंडर्स मागविलीं जात. हुंड्यांचा तुटवडा बाजारांत झाल्यामुळें ही रकम १५, १० व ५ लक्ष पौंडांवर अनुक्रमानें उतरवण्यांत आली आहे. हुंडणावळीचा दर हुंड्या खरेदी करणारांस अनुकूल व्हावा म्हणून $\frac{१}{१६}$ पेनीनें कमी करण्यांत आला आहे, हें वर सांगितलेंच आहे. हा दर ह्याहिपेक्षा खाली जाऊं न देण्यासाठी रिझर्व्ह बँक व सरकार ह्यांस योग्य उपाय योजावे लागतील. त्याचप्रमाणें, लंडनला पाठवावयाच्या रकमांची भरती होईल अशी तजवीजहि त्यांस केली पाहिजे. हुंड्यांविषयींची आपली साप्ताहिक मागणी त्यांनीं कमी केली असल्याचा उल्लेख वर आला आहे. हिंदुस्थान सरकारच्या खात्यावर रिझर्व्ह बँकेंत असलेल्या पैशाचा उपयोग ह्या कामीं करण्यांत येईल. आपल्या लंडनमधील निधींतले कर्जरोखे काढून टाकून त्यांच्या रकमा बँक सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या खात्यावर जमा करील आणि तितक्या किंमतीच्या चलनी नोटा हिंदुस्थानांत रद्द करील. ह्याप्रमाणें देशांत खेळणारें चलन मर्यादित झाल्यानें

पैशाची चणचण उत्पन्न होईल आणि विलायती हुंड्यांचा पुरवठा वाढण्यास व हुंडणावळ वर चढण्यास सहाय होईल. तथापि, हें चलनाच्या आकुंचनाचें धोरण विशिष्ट मर्यादेबाहेर जाऊं देतां यावयाचें नाहीं, कारण पैशाच्या तंगीचा परिणाम व्याजाचे दर चढण्यांत होईल आणि अशी प्रवृत्ति आर्थिक राष्ट्रीय दृष्ट्या सरकारासहि अनिष्ट वाटेल.

## "श्री गजानन मिल्स समाचारा"चा रौप्यमहोत्सवांक

श्री. विष्णुपंत वेलणकर ह्यांच्या सांगली येथील श्री गजानन वीव्हिंग मिल्सला २५ वर्षे पुरीं झालीं. तिच्या रौप्यमहोत्सवा-निमित्त श्री "गजानन वीव्हिंग मिल्स समाचारा"चा विशेष अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. श्री. वेलणकर ह्यांनीं १९१२ सालीं आपला कारखाना पुणें येथें स्थापन केला, त्याचें सांगली येथें १९१४ सालीं स्थलांतर झालें. अनेक अडचणींस तोंड देऊन त्यांनीं तो उत्कर्षास आणला. १९२५ सालीं कारखाना आपल्या मालकीच्या इमारतीमध्यें आला व त्याचा व्याप हळुहळु वाढत चालला. १९२६ सालीं २२ माग होते ते १९२८ मध्यें ५० झाले आणि पुढच्या तीन वर्षांत तीच संख्या ९० वर गेली. १९३४ सालीं १६६ माग झाले व त्यांची संख्या लवकरच २५० होईल. १९३५ सालीं श्री. वेलणकर ह्यांनीं जपानचा प्रवास केला. श्री गजानन मिल्समध्यें पातळांच्या बरोबर आतां रेशमी शर्टिंग व कोटिंग निघूं लागलें असून बाजारांत त्यांचा जम बसूं लागला आहे. अत्यंत अल्प प्रमाणावर स्थापन झालेल्या ह्या कारखान्यानें संपादन केलेलें यश अत्यंत अभिनंदनीय आहे ह्यांत संशय नाहीं. श्री. वेलणकर ह्यांच्या कर्तबगारीनें श्री गजानन मिल्समधून अनेक प्रकारांचा नवीन विविध माल लवकरच निघूं शकेल, अशी अपेक्षा आहे. श्री. वेलणकर ह्यांची वेलणकर ट्रस्टची २ लक्ष रुपयांची योजना सर्वांस परिचित आहेच; त्यावरून त्यांच्या सहायकारी मनोवृत्तीची कल्पना येते. रौप्यमहोत्सवांकांत श्री गजानन मिल्सविषयीं तपशीलवार माहिती दिलेली आहे, तीवरून ह्या यशस्वी कारखान्याच्या उज्वल भवितव्यतेबद्दल विश्वास वाटतो. श्री. वेलणकर व त्यांची श्री गजानन मिल ह्यांस दीर्घायुष्य लाभून त्यांच्या उद्योगानें महाराष्ट्रीय आर्थिक उन्नतीस अधिकाधिक सहाय होवो असें आम्ही इच्छितों.

## "बॉंबे कोऑपरेटिव्ह क्वॉर्टर्ली"

वरील त्रैमासिकाचा मार्च, १९३८ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. "जगाच्या आर्थिक व्यवहारांत सहकाराचें स्थान" ह्या विषयावरील प्रो. हिल्डब्रान्ड्ट् ह्यांच्या, "रुंडशौ" ह्या जर्मन साप्ताहिकांतील एका लेखाचा परामर्श प्रो. काळे ह्यांनीं घेतला आहे. त्यांत सहकाराच्या तत्त्वाची छाननी केली असून सहकारी चळवळीनें जनतेचें आर्थिक बल कसें वाढविलें आहे, हें दाखविलें आहे. श्री. हुली ह्यांच्या 'डेनमार्कमधील शेतीविषयक सहकार्य" ह्या लेखाचा तिसरा व शेवटचा भाग प्रसिद्ध झाला आहे. श्री. मळजी ह्यांनीं आपल्या लेखांत प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या इतिहासाचें सिंहावलोकन करून तिच्या घटनेंत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. श्री. कोठारी ह्यांनीं जमीन गहाणाच्या बँकांचे व्यवहारांसंबंधीं चर्चा केली असून श्री. त्रिवेदी ह्यांच्या लेखांत हिंदी शेतकऱ्यांच्या जीवनाविषयीं व त्यांच्या सुधारणेविषयीं माहिती दिलेली आहे. पुस्तकांवरील अभिप्राय, सहकाराची प्रगति, प्रकाशित ग्रंथांची यादी, संपादकीय स्फुटें, सहकारी वृत्त, इन्स्टिट्यूटच्या कामाची हकीकत, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें व सरकारी ठराव, इत्यादि नित्याचीं सदरें अंकांत आहेत.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,०५,५०,०००

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.



म. गांधींची उदात्तता—
हिमालयाची उत्तुंगता—
ताजमहालाचें सौंदर्य—
यांनीं

सारी मुंबई दिपवणारा
ज्वाला

हंसाचा पांचवा बोलपट

भूमिकाः—चंद्रमोहन, रत्नप्रभा, विनायक

## संयुक्त भांडवलाच्या हिंदी मंडळ्या

व्यापार व उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर व्यक्तिशः चालविण्यापेक्षा त्याकरितां संयुक्त भांडवलाच्या मंडळ्या स्थापणें सोईचें जातें. अशा प्रकारच्या मंडळ्या अस्तित्वांत येऊन पुरें एक शतकही लोटलें नसेल; तथापि, मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर संयुक्त भांडवलाच्या सहायानें व्यवहार करणें आतां सर्वत्र केवळ सोयीचें नव्हें तर आवश्यक झालें आहे. शास्त्रीय शोध व यांत्रिक प्रगति ह्यांचे मदतीनें उत्पादन वाटेल तेवढें करतां येतें आणि मालाच्या उठावाची गति हीच उत्पादनाची मर्यादा ठरते. औद्योगिक क्षेत्रांत पुढारलेल्या सर्व देशांनीं संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांची स्थापना करूनच राष्ट्रीय संपत्तींत भर घातली आहे. हिंदुस्थानांत ही कल्पना थोडी-फार नवीन असली, तरी तिनें येथें मूळ धरलें आहे. कापसाच्या, कापडाच्या व तागाच्या गिरण्या, सिमेंटचे, पोलादाचे व साखरेचे कारखाने, खाणी, चहाचे मळे, बँका, विमा, वीज इत्यादि संबंधांतल्या मंडळ्या, ह्या सर्वांचे व्यवहार मर्यादित संयुक्त जबाबदारीचे तत्त्वावरच चाललेले आहेत. दरसाल अनेक नवीन मंडळ्यांची स्थापना होत असून कित्येक जुन्यांचें विसर्जनहि होत आहे. जनन-मरणाच्या फेऱ्यांतून ह्या संस्था सुटलेल्या नाहींत. उत्पत्ति-लयाचा नियम त्यांसहि लागू आहे.

ब्रिटिश हिंदुस्थान व सहा प्रमुख हिंदी संस्थानें ह्यांचेमधील मंडळ्यांविषयीं दरसाल आकडे प्रसिद्ध होत असतात. त्यांवरून असें दिसतें कीं १९३४-३५ अखेरपर्यंत हिंदुस्थानांत एकूण २०,५०० मंडळ्यांची स्थापना झालेली होती. तथापि, सालअखेर त्यांचेपैकी निम्म्यापेक्षा अधिक विसर्जन पावल्या होत्या. ह्यावरून हिंदी कंपन्यांच्या अल्प आयुर्मर्यादेची कल्पना येते. तरीहि, मंडळ्यांच्या एकूण संख्येंत दरसाल वाढ होत आहे. १९१३-१४ चे मानानें १९३४-३५ सालीं सुमारें चार-पट मंडळ्यांचा व्यवहार चालू होता. एकूण ९,८४२ मंडळ्यांचें मिळून भरणा झालेलें भांडवल ३ अब्ज, ४ कोटि रुपये होतें. गेल्या दहा वर्षांत कपास कापडाच्या गिरण्यांतील भांडवल ४२ कोटि रुपयांवरून ३६½ कोटि रुपयांपर्यंत घसरलें; चहाचे मळे व बँका ह्यांमध्यें गुंतविलेल्या भांडवलांत मात्र वाढ झाली. १९३४-३५ मध्यें बँका व विमा कंपन्या ह्यांचें भरणा झालेलें भांडवल ३७ कोटि रुपये होतें. विमा मंडळ्यांचें अधिकृत भांडवल ५८ कोटि रुपये असून जमा झालेलें भांडवल ३¾ कोटि रुपये इतकेंच होतें, ही नजरेंत भरण्यासारखी गोष्ट आहे.

रेल्वे व ट्रामगाड्या ह्यांचे मंडळ्यांमध्यें १९३४-३५ सालअखेर १५ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें होतें. ९७ कोटि रुपये कारखाने व व्यापारी मंडळ्या ह्यांचे वांटणीस गेले. कपास, ताग, रेशीम व लोंकर ह्यांच्या कापडाच्या गिरण्यांमध्यें ६९ कोटि रुपये भांडवल उत्पादनास सहाय करीत होतें. चहा, कॉफी व इतर मळे ह्यांनीं १६½ कोटि रुपयांचें भांडवल आकर्षलें होतें. ह्यापैकीं सुमारें १२ कोटि रुपये एकट्या चहाचे मळ्यांत गुंतले आहेत. चहाच्या बहुतेक सर्व मंडळ्या कलकत्ता येथें नोंदलेल्या आहेत. खाणींतून खनिज द्रव्यें काढणाऱ्या मंडळ्यांचे वाट्यास ४० कोटि रुपये भांडवल होतें. ६¾ कोटि भांडवलावर साखरेचे कारखाने चालू आहेत. ह्या रकमेपैकीं बंगाल व संयुक्त प्रांत ह्यांनीं ४ कोटींची उचल केलेली आहे. हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या अनेक मंडळ्या (सुमारें १,०००) हिंदुस्थानांत व्यवहार करीत आहेत. त्यांचें भरणा झालेलें भांडवल ७½ अब्ज रुपये असून डिबेंचर्सची रकम २¼ अब्जांवर आहे. ह्या मंडळ्यांचा व्यवहार हिंदुस्थानाबाहेर फार मोठ्या प्रमाणावर चालत असतो व त्यांनीं हिंदुस्थानांत गुंतविलेल्या भांडवलाविषयीं माहिती उपलब्ध होत नाहीं.

संयुक्त भांडवलाच्या मंडळ्यांचे मुळाशीं असलेलें तत्त्व लहान प्रमाणावरील उद्योग धंद्यासहि लागू करण्याचा यत्न सर्वत्र होत असलेला दिसून येतो. जबाबदारी मर्यादित असल्यामुळें भरमसाट व्यवहार करण्याची इच्छा मंडळ्यांचे चालकांस होण्याची भीति असते. ह्याबाबतचा कटु अनुभव अनेकांस आलेला आहे. केवळ कायद्यानें सोय करून दिली म्हणून तिचा दुरुपयोग होणें वाजवी नाहीं. हिंदी कंपनी-कायद्यांत दुरुस्ती करून अशा उद्योगाचें बरेचसें नियंत्रण सरकारनें नुकतेंच केलें आहे.

---

**श्रीचौंडेमहाराज सत्कारसमारंभ**

गोरक्षणाच्या चळवळीचे प्रमुख पुरस्कर्ते श्रीचौंडेमहाराज ह्यांची षष्ठ्यब्दि येत्या वैशाख (मे) महिन्यांत साजरी करण्यांत येणार आहे व त्यावेळीं त्यांचा चरित्रग्रंथ प्रकाशित केला जाणार आहे. जनतेनें ह्या समारंभांत अंशभागी व्हावें, अशा अर्थाचें विनंतीपत्रक कित्येक प्रमुख गृहस्थांच्या सहीनें निघालें आहे. षष्ठ्यब्दि-समारंभाचे वेळीं सर्वांनीं मध्यवर्ती गोवर्धननिधीची पूर्ती करण्यास हातभार लावावा, अशी श्रीगोवर्धन संस्थेची विनंति आहे.


**ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत**

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

**संगीत-मार्गदर्शक**

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

**कर्जाची पहिली वांटणी**

ता. २७ जुन १९३८ रोजीं कंपनीच्या नियमानुसार कर्जवांटणीस सुरुवात होणार असून पूर्ण पैसे भरून सर्टिफिकेटस् घेणाराचे नंबर कर्जवांटणीच्या याद्दींत समाविष्ट होतील. तरी ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांनीं ते तावडतोब भरावेत व स्वल्प म्हणजे रुपयास सुमारे १ पै व्याजाच्या कर्जाचा फायदा घेऊं इच्छिणारांनीं सर्टिफिकेटस् खरेदी करण्याची त्वरा करावी. प्रास्पेक्टस्करितां ०/– चीं तिकिटें पाठवा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी लि०**

हेड ऑफिसः-गिरगांव मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें.

—मनपसंत काम—

**रिसवूड ब्रदर्स-टेलर्स**

वक्तशीरपणाची गॅरंटी. सदाशिव हौदानजिक, पुणें.

**THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.**

**THE DECCAN TAILORING FIRM,** *DECCAN GYMKHANA, POONA 4.*

**TAILORS & CLOTH MERCHANTS**

—*A FRESH STOCK OF NEW DESIGNS*—

**WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.**

**LONDON TRAINED CUTTER.**

*MANAGER*—M. N. PATASKAR,

*F. C. D. ( London ).*

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर-मुंबई.

यांचे

ऑरिजिनल

ब्राह्मी तेल

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यावर

बाळंत काढा

नं. १ दहा दिवसांत घेणेचा.

नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.

मुलांकरितां बाळकडू. कुमारी आसव

मुख्य दुकान: ठाकुरद्वार, शाखा: परळ व दादर.

पुणें एजंट:—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co

NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

**व्ही. व्ही. ॲन्ड को०**

जंपर स्पेशालिस्ट

लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,

४८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर.

पत्ता बदलला

**मराठी केन्द्र**

ही

१ जानेवारी १९३८ पासून

२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.

भेटा अगर लिहा:—

**भाऊ गंगाधर माटे,** कंत्राटदार

चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

# भक्कम पायावरील भव्य इमारत

## वेस्टर्न इंडियाच्या उच्च आकांक्षेचें

## —: प्रचंड प्रतीक :—

### वेस्टर्न इंडियाचा मजबूत पाया

(१) काटकसरीचा व्यवहार.
(२) पैसा गुंतविण्यांतील दूरदृष्टि आणि काळजी.
(३) मूल्यमापनाचा कडक आधार व त्यामुळें भरपूर लाइफ फंड.
(४) भरपूर राखीव फंड.
(५) कंपनीच्या कारभारावर विमेदारांचें नियंत्रण.
(६) विमेदारांना नफ्यांतील जास्तींत जास्त हिस्सा.
(७) माफक हप्ते.
(८) साध्या, सोप्या विमा योजना.
(९) सेवेविषयीं निष्ठा.
(१०) अत्यंत प्रामाणिक कर्तव्य-निष्ठा.

# वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शु० कं. लि.

# सातारा

### शाखा

पुणें:—लक्ष्मीरोड.
नागपूर:—वॉकररोड.
कराची:—९ रामेश्वर मॅन्शन, बंदररोड.
अहमदाबाद:—गांधीरोड, बाला-हनुमानसमोर.
मुंबई:—वेस्टर्न इंडिया हाऊस, फेरोजशहा मेथा रोड, फोर्ट.

संपूर्ण स्वदेशी विमा संस्था

### ऑर्गनाइझिंग ऑफिसें

सेंट्रल इंडिया व रजपुताना:— १८, मेनरोड, तोफखाना इंदूर.
दक्षिण हैद्राबाद:—बेगम बझार.
कोल्हापूर:—महाद्वार रोड.

### चीफ एजन्ट

कलकत्ता, लाहोर, दिल्ली, बनारस, मद्रास वगैरे ठिकाणीं.

## विजयानगरम् येथें सहकारी प्रश्नांची चर्चा

अखिल भारतीय सहकारी बँकांच्या व इन्स्टिट्यूटसच्या असोसिएशन्सचीं कार्यकारी मंडळें आहेत, त्यांची जोड सभा आंध्र देशांत विजयानगरम् येथें ईस्टरच्या सुट्टींत भरली होती आणि तींमध्यें सहकारी चळवळीविषयींच्या विशेष अगत्याच्या प्रश्नांची चर्चा झाली. सभेस निरनिराळ्या प्रांतांतले प्रतिनिधी आले होते आणि मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या वतीनें प्रो. काळे उपस्थित होते. विस्तृत चर्चा होऊन सभेंत कित्येक ठराव मान्य करण्यांत आले, त्यांचा गोषवारा खालीं दिला आहे.:—

( १ ) आंतरराष्ट्रीय अशांततेविषयीं खेदप्रदर्शन आणि सहकारी आर्थिक पद्धति आणि परस्पर सहायाची वागणूक यांच्या परिणामकारित्वावर दृढविश्वास.

( २ ) खेडेगांवी पतपेढ्यांचें काम पहाण्यास पुरेसा वेळ ज्यांस देतां येईल अशा अनुभवी व पगारी माणसांची नेमणूक करण्याची आवश्यकता. जरूर असेल तेथें एकापेक्षां अधिक गांवांतील पेढ्यांवर अशा इसमांची नेमणूक व्हावी.

( ३ ) अनुकूल परिस्थिति असेल अशा टापूंत अनेक उद्दिष्टें असलेल्या सहकारी संस्था (मल्टिपर्पज सोसायटीज) स्थापण्याचा प्रयत्न व्हावा. तथापि, त्यांची पूर्वी अस्तित्वांत असलेल्या संस्थांशीं अनिष्ट स्पर्धा होतां कामा नये.

( ४ ) सहकारी संस्थांच्या कारभारांत हात घालण्याचा अधिकार कायद्यानें रजिस्ट्रार्सना दिलेला असेल तो काढून घेण्यांत यावा. त्यांच्या कमिट्या किंवा त्यांचे सभासद अथवा नोकर दूर करणें, त्यांच्या अनुमतीवांचून त्यांचे पोट नियम बदलणें, त्यांच्या अधिकाऱ्यांकडून नुकसानीबद्दल दंड वसूल करणें इत्यादि बाबतींतली रजिस्ट्रार्सची सत्ता मर्यादित व्हावी.

( ५ ) सध्या ताग, कपास, गहूं, ऊंस, नारळ इत्यादि शेतीच्या मालाच्या किंमती उतरल्या असल्यानें ह्या पिकांची लागवड, विक्री वगैरे बाबतींत काय योजना अमलांत आणतां येईल ह्याचा विचार प्रांतिक व मध्यवर्ती सरकार ह्यांनीं सहकार्यानें करावा.

( ६ ) शेती, सहकार व खेडेगांवीं धंदे ह्यांचा निकट संबंध असल्याकारणानें त्यांसंबंधांतलीं सरकारी खातीं एकाच मंत्र्याचे हाताखालीं असावीं आणि त्यांचें काम घटनात्मक पद्धतीनें केलें जावें.

( ७ ) सहकारी संस्थांच्या येणें कर्जाबाबत कर्जदाराची मालमत्ता खटल्याचा निकाल होण्यापूर्वी जप्त करण्याबाबतची तरतूद ज्या प्रांतांत नसेल तेथें ती, कायद्यांत दुरुस्ती करून, केली जावी.

( ८ ) कित्येक प्रांतांत पतपेढ्यांच्या कर्जाच्या फेडीदाखल सेंट्रल बँकांस त्यांच्या सभासदांच्या जमिनी ताब्यांत घ्याव्या लागल्या आहेत. ह्या जमिनींचें काय करावयाचें हा सदरहू बँकांच्यापुढें अवघड प्रश्न येऊन पडला आहे. रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या ३ नंबरच्या चोपड्यांत असलेल्या परिस्थितींत ब्रह्मदेशामध्यें अंमलांत आणल्या गेलेल्या योजनेचें वर्णन केलेलें आहे. तिला अनुसरून योग्य योजना आवश्यक असेल त्या प्रांतांत चालू करण्यांत याव्या. कर्जफेडीची लांब मुदतीची हप्तेबंदी करण्यांत यावी आणि ही फेड खंडाचे रूपांत झाली असतां कर्जदारांस त्यांची जमीन परत मिळावी, अशा योजनेचा उपक्रम केला जावा. ह्यासाठी प्रांतिक सरकारांनीं भांडवलाची व इतर मदत सेंट्रल बँकांस करावी.

( ९ ) सावकारी हिशेब ठेवण्याची पद्धति व त्यांची तपासणी आणि त्यांचें रजिस्ट्रेशन इत्यादि संबंधांत कायद्यानें नियंत्रण घातलें जाणें आवश्यक आहे.

( १० ) सेंट्रल बँकांचें रूपांतर बँकिंग युनिअन्समध्यें व्हावें अशी सूचना रिझर्व्ह बँकेच्या स्टॅच्युटरी रिपोर्टांत आहे, ती मान्य करतां येत नाहीं. विशेष अनुकूल परिस्थिति असेल तेथेंच हा प्रयोग केला जावा.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११८—६ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०३–१४ |
| ४% १९४३ | १०८—७ |
| ३½% बिनमुदत | ९९–१¾ |
| ३½% १९४७–५० | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४०—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १११—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३०–१० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११६—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७२०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १२६—४ |
| कराची ( १०० ) ९% | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २००—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३२७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४२०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १४६—४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४१—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | १७–१५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३७—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०४—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १७२—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २१७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | ९२०—० |

### हिंदी बंदरांतून चालणारा व्यापार

हिंदुस्थानांतील कांहीं मोठीं बंदरें हिंदुस्थान सरकारच्या नियंत्रणाखालीं असून बाकीच्या बंदरांवर प्रांतिक सरकारांची देखरेख असते. खालील सात बंदरें मध्यवर्ती सरकारचे नियंत्रणाखाली आहेत, त्यांच्या व्यापाराचे आकडे दिले आहेतः---

| बंदराचें नांव | १९३६–३७ सालीं बंदरांतून झालेली आयात-निर्गत ( लक्ष टन ) |
|---|---|
| कराची | २० ३/४ |
| मुंबई | ५४ १/२ |
| कोचीन | ( उपलब्ध नाहीं ) |
| मद्रास | १० १/२ |
| विजगापट्टम | ४ ३/४ |
| कलकत्ता | ८५ १/२ |
| चितगांव ( १९३५–३६ ) | ३ १/२ |

१९३५ सालीं लंडन बंदरांतून ३ कोटि, ८० लक्ष टन मालाची आयात--निर्गत झाली, त्या मानानें वरील आकडे फारच लहान वाटतात.

---

### हिंदी कोळशाच्या खाणी

हिंदुस्थानांतील खाणींतून दरसाल सुमारें २ कोटि टन कोळसा निघतो. कोळशाचें जागतिक वार्षिक उत्पादन सुमारें १ अब्ज, २५ कोटि टन आहे. कोळशाच्या खाणी मुख्यत: बंगाल, मध्यप्रांत, बिहार व ओरिसा ह्या प्रांतांत आहेत. राणीगंज व झारिया येथील खाणींतून एकूण हिंदी उत्पादनाच्या ७५ टक्के कोळसा निघतो. उद्योगधंद्यांची मंद प्रगति, कारखान्यांची यंत्रें चालविण्यास तेल व वीज ह्यांचा वाढता उपयोग करण्याची प्रवृत्ति, दक्षिण आफ्रिकेंतील कोळशाची हिंदी बाजारांत स्पर्धा, इत्यादि कारणांचा कोळशाच्या खपावर प्रतिकूल परिणाम होऊन भावहि किफायतशीर राहिलेले नाहींत. हिंदी खाणींतील कोळसा आणखी फक्त १२० वर्षें पुरेल असा अजमास आहे. कोळशाचा पुरवठा टिकावा व खाणींतील अपघातांस आळा बसावा ह्याविषयीं प्रयत्न चालू आहेत.

---

### सकस अन्नाच्या अभावामुळें लोकसंख्येचा ऱ्हास

दक्षिण आफ्रिकेंतील तद्देशीयांस सकस अन्न खावयास न मिळाल्याकारणानें त्यांचे आरोग्यावर अनिष्ट परिणाम होऊं लागला आहे. खाणींत काम करण्यासाठी येणाऱ्या मजुरांत शरीरानें नालायक असलेल्यांचा भरणा वाढत आहे. निवडलेल्या मजुरांस कामास लावण्यापूर्वी कांहीं आठवडे त्यांस पोषक अन्न खावयास द्यावें लागतें. पुरेसे स्थानिक मजूर न मिळाल्यामुळें बाहेरून आणलेल्या कामकऱ्यांस मजूरी मिळते व दक्षिण आफ्रिकेंतील लोकांचा दुबळेपणा जास्तच वाढतो. काम नाहीं म्हणून मजूरी नाहीं, मजूरी नाहीं म्हणून अन्न नाहीं व अन्न नाहीं म्हणून कामाची लायकी नाहीं, असें हें न सुटणारें कोडें आहे.

---

### गिऱ्हाइकाच्या उपकाराची फेड करणारा गवळी

कित्येक वर्षें वकिलीणबाई एकाच गवळ्याकडून दूध घेत असत. एके दिवशीं गवळ्यानें विचारलें:--"वकील साहेब घरीं आहेत का ?" "नाहींत, ते बाहेर गेले आहेत" असें बाईंनीं उत्तर दिलें. गवळी म्हणाला, "आतां काय करणार ! आज अनेक वर्षें तुम्हीं माझे गिऱ्हाइक आहांत, म्हणून म्हटलें आपले उपकार स्मरावे. दुधांत पाणी घालण्याबद्दल कोर्टांत माझेवर फिर्याद करण्यांत आली आहे. वकीलपत्र द्यायला आलों होतों."





अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें १
[ माहितीपत्रक मागवा ]

आपण विचार केला आहे का ?—

श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी ता. १।२।३८ च्या 'केसरी'त लिहितात. "......सर्वसाधारण बॉंड योजनांच्या विरुद्ध मी तो लेख लिहिला असें नाहीं. बॉंड योजना हा विम्याच्या अनेक प्रकारापैकीं एक प्रकार आहे व प्रत्येक योजनेचा विचार जिच्या तिच्या गुणावरून केला पाहिजे..." सही ग. स. मराठे

कल्पतरु बॉण्ड

इतका लोकप्रिय होण्याचें कारण—ती योजना बहुजनांस पटली आहे. अजूनहि फक्त १३॥ रु. भरून 'कल्पतरु बॉंड' घेतल्यास येत्या बक्षीस वांटणींत बक्षीस मिळण्याची संधि साधतां येईल. अधिक माहितीकरितां स्थानिक प्रतिनिधीस भेटा, किंवा खालील पत्त्यावर लिहा :

टी. आर. अमंग स्पे. ऑ.) महाराष्ट्र अिन्शुअरन्स कं.
सातारा सिटी ) लि., कऱ्हाड (जि. सातारा)

दि प्रॉव्हिन्शिअल बँक
ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम्. स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. टाकर.

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.


अेम्. जमशेदजी, अेजण्ट, मुंबई
अेस्. अेम्. भावे, अेलअेल्. बी. सेक्रेटरी, पुणें.


# नव्या फोर्ड गाड्या

तीस हॉर्स पॉवरच्या आणि बावीस हॉर्स पॉवरच्या अशा दोन

## नव्या फोर्ड व्ही एट मोटार गाड्या

आमच्या शोरूममध्यें पहाण्यासाठी ठेवल्या आहेत.





- ह्या गाड्यांमध्यें हें विशेष नावीन्य आहे कीं त्या दिसण्यांत सुंदर असून सुखकारक आणि सुरक्षित आहेत.
- ह्या नव्या फोर्ड व्ही एट गाड्या इतक्या आकर्षक आहेत कीं सर्व मोटार वापरणारांस त्या तात्काळ पसंत होतील अशी आमची खात्री आहे.
- दहा हॉर्स पॉवरच्या व आठ हॉर्स पॉवरच्याहि गाड्या पहाण्यासाठी ठेवल्या आहेत.

## सिल्व्हर ज्युबिली मोटार्स लिं०

१२, आर्सेनाल रोड, : : : : पुणें.

### वेस्टर्न इंडिया मॅच कंपनीचे ३२ लाख रुपयांचे भाग विक्रीस निघाले

वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि. ह्या नांवानें एका खासगी संयुक्त भांडवलाच्या मंडळीची १९२३ सालीं स्थापना झाली, तेव्हां तिचें अधिकृत भांडवल १ लक्ष रुपये होतें. १९२४ सालीं तें १० लक्ष रुपये करण्यांत आलें व १९२५ मध्यें पुनः तें वाढवून ७५ लक्ष रुपये केलें गेलें. १९२९ मध्यें कंपनीचें रूपांतर करण्यांत येऊन अधिकृत भांडवल २ कोटिपर्यंत वाढविण्यांत आलें. त्यांपैकीं ६६,८९,३०० रुपयांचे ६६,८९३, भाग स्वीडिश मॅच कंपनीचे मालकीचे आहेत.ह भाग शक्य तितक्या लवकर हिंदी नागरिकांकडे वर्ग करण्याविषयीं कंपनीनें हिंदुस्थानसरकारास वचन दिलेलें आहे. त्यास अनुसरून आतां ३१,८९३ भाग विक्रीस निघाले आहेत. त्यांपैकीं ६,८९३ भागांसाठीं अगोदरच अर्ज नोंदलेले आहेत. विक्रीस निघालेल्या सर्व भागांच्या विक्रीबद्दल सेंट्रल बँक ऑफ इंडियानें व इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानें हमी घेतलेली आहे.

वेस्टर्न इंडिया मॅच कंपनीचे अंबरनाथ, मद्रास, कलकत्ता व बरेली ( संयुक्तप्रांत ) येथें आगपेट्यांचे कारखाने आहेत. त्या सर्वांत मिळून ३,७०० कामगारांस काम मिळतें. ७,२०० पेट्यांचे एक खोकें ह्याप्रमाणें कंपनीचे कारखान्यांत १९३७ सालीं २ लक्ष १९ हजार खोकीं तयार झालीं. कंपनीनें गेल्या सालीं करमाफ ६ टक्के दरानें डिव्हिडंड दिलें. स्वीडिश मॅच कंपनीकडे वेस्टर्न इंडिया मॅच कंपनीची व्यवस्था सोपविलेली आहे. १९५७ अखेर ती कंपनी मॅनेजिंग एजंट म्हणून काम पहाणार आहे. स्वीडिश मॅच कंपनी सहा महिन्यांची नोटीस देऊन केव्हांहि मॅनेजिंग एजन्सी सोडून देऊं शकेल.

### कोलार येथील सोन्याच्या खाणी

कोलार येथील खाणींतून सोनें काढणाऱ्या चार प्रमुख कंपन्यां-विषयींचे आकडे येथें दिले आहेत. चँपियन रीफ गोल्ड माइन्स ऑफ इंडिया लि. ह्या कंपनीनें आजवर सुमारें ७ कोटि रुपये डिव्हिडंड वांटलें आहे. १९३६ चा डिव्हिडंडचा दर ४५% होता. नंदीदुर्ग माइन्स लि. नें आजपर्यंत वाटलेल्या डिव्हिडंडची रकम ५½ कोटि रुपयांवर जाते. १९३६ सालीं भागीदारांस ७२½% दरानें डिव्हिडंड मिळालें. म्हैसूर गोल्ड माइनिंग कंपनीचे तत्सम आकडे १४½ कोटि व २७½% असे आहेत. ऊरगाम गोल्ड माइनिंग कंपनीनें आजतागायत दिलेल्या डिव्हिडंडची रकम ५½ कोटि रुपये भरते. गेल्या वर्षी तिनें ऑर्डिनरी भागांवर ७½ टक्के व प्रेफरन्स भागांवर १७½ टक्के डिव्हिडंड दिलें. वरील कंपन्यांच्या खाणींची खोली सुमारें ७ हजार फूट आहे.

### साखर कारखान्यांची संख्या वाढली पण उत्पादन कमी होणार

हिंदी साखर कारखान्यांत १९३७-३८ चे मोसमांत १ कोटि, १४½ लक्ष टन ऊंस गाळला जाऊन साखरेचें उत्पादन १० लक्ष, ४५ हजार टन होईल, असा सरकारी अजमास आहे. १९३६-३७ सालीं १ कोटि, १६½ लक्ष टन ऊंस गाळला जाऊन त्यापासून ११ लक्ष, ११ हजार टन साखर निघाली होती. म्हणजे, चालू मोसमांतील साखरेचें अपेक्षित उत्पादन ६७ हजार टनांनीं कमी भरेल साखर कारखान्यांच्या संख्येंत आठ नवीन कार-न्यांची भर पडली असली तरी यंदाचा मोसम लवकर संपेल व साखरेचा उतारा कमी पडेल, असा अंदाज आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,३०,२५० वसूल झालेलें भांडवल १,१४,७५५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर-बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.



## ३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वीं आपला विमा उतरवून नवीन बोनसमध्यें भागीदार व्हा.

२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. एकदां विमा उतरण्याचे ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.

अधिक माहितीकरितां लिहा :

## दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि०

पुणें २.

शाखा: मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.



"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सह-कार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

पोषाक निटिंग, बर्डीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६७५ सदाशिव पेठ.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## गव्हाचे पोहे

(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

५५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळ:—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १


चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतींच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.



## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]

मो. मु. टिळक

प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

## पूना गेस्ट हाउस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक—पुणें.

हवेशीर जागा — सुग्रास भोजन — उत्तम आदरातिथ्य


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.